# <u>प्रेसनोट</u>

**दत्तवाडी पो.स्टे.पुणे**
**दि. ०६/०८/२०१९**

**‘ गहाळ झालेल्या मोबाईल पोलीसांच्या तत्परतेने एका तासात परत मिळाला ’**

सध्या पुणे शहर व परिसरात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने नदीला पाणी जास्त सोडल्याने नदीकाठच्या लोकांना त्याचा धोका होवु नये म्हणुन पोलीस गस्त घालत आहेत. तशीच गस्त जनता वसाहत कॅनॉलच्या परिसरामध्ये दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे व पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद भोसले, पोलीस कॉन्स्टेबल रेवन्नाथ जाधव असे सायंकाळी गस्त घालत असताना त्यांना रस्त्यामध्ये एक मोबाईल मिळुन आला तो मोबाईल कोणाचा आहे या बाबत त्यांनी आजुबाजुच्या नागरिकांकडे चौकशी करता कोणालाही काही सांगता आले नाही म्हणुन त्यांनी मोबाईलवर इतर संपर्क क्रमांकावर संपर्क केला असता हा मोबाईल पांडुरंग तुकाराम रसाळ रा. गल्ल्ी नं ५९ वाघजाई माता मंदिर जनता वसाहत पुणे यांचा असल्याचे समजले त्या प्रमाणे पांडुरंग रसाळ यांना संपर्क करुन त्यांचा मोबाईल त्यांना परत दिला. पांडुरंग रसाळ यांनी सांगितले की मी माझ्या घरातुन कामानिमीत्त बाहेर गेलो होतो परंतु माझा मोबाईल खिशातुन कोठे पडला हे मला माहित नसल्याने तो मला मिळाला नाही. पोलीसांनी कर्तव्य भावनेतुन मोबाईल परत मिळुन दिला याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे शहर